# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दिनांक:-** २४ जुलै,२०२१

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एम.ए. एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) या दोन वर्षीय स्किल ओरियंटेड व रोजगारभिमूख पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून ऑनलाईन पध्दतीने थेट प्रवेश देणे सुरु आहे.

एम.ए. एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) या दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम चार सत्रात शिकविला जातो. युजीसीच्या नवीन नियमावलीनुसार या अभ्यासक्रमाचे पुर्नगठण करण्यात आले असून यात विद्यार्थ्यांचे पत्रकारिता आणि जनसंवाद क्षेत्रातील कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात आलेला आहे. सीबीसीएस (Choice Based Credit System) नुसार या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इतरही अधिकचे कौशल्य शिकता येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराचे नवे दालन उपलब्ध होणार आहे. स्किल ओरियंटेड अंतर्गत विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल, भारतीय संगीत कला, योगशास्त्र, क्रीडा प्रकार, इंग्लिश स्पिकिंग, रेडीओ जॉकी, व्हिडीओ संपादन, कॅमेरा हॅंडलिंग, सायबर सिक्युरिटी आदी विषयांपैकी प्रत्येक सत्रात एक याप्रमाणे चार विषय निवडून रोजगाराचे इतरही क्षेत्र विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहे.

एम.ए. एम.सी.जे. हा अभ्यासक्रम पूर्णत: रोजगारभिमूख असून यशस्वी विद्यार्थ्यांना वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, ऑनलाईन पत्रकारिता, सोशल मिडिया, जाहिरात संस्था आदी ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध आहे. त्याचबरोबर शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, सोशल मिडिया हॅंडलर म्हणून कार्य करण्याची देखील संधी उपलब्ध आहे.

एम.ए.एम.सी.जे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही शाखेतील पदवी किंवा ४० गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून ऑनलाईन ॲडमिन लिंक ला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरतांना आवश्यक त्या कागदपत्रांची स्कॅन कॉपी सोबत असणे गरजेचे आहे. तरी ईच्छुक विद्यार्थ्यांनी एम.ए. एम.सी.जे. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी विभागप्रमुख प्रा.डॉ. सुधीर भटकर (९४२३४९००४४) किंवा डॉ. विनोद निताळे (९८६००४६७०६) अथवा विभागात कार्यालयीन वेळेत (०२५७-२२५७४३६, २२५७४३८) संपर्क साधावा असे आवाहन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. अनिल चिकाटे यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील
(जनसंपर्क अधिकारी)